**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.**

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/जालना/२९२/२०१०/१९

तक्रार दाखल दिनांक :- ०७/०६/२०१०
निकाल दिनांक :- ०५/०८/२०१०

श्री पद्मनाथ उत्तमराव जोशी,
देशपांडे गल्ली,ता.परतुर जिल्हा जालना.
ह.मु. श्री विशाल भास्कर परतुरकर,
अनिरुध्द अपारमेंट गारखेडा,अंलकार सोसायटी,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.५२४०१०१००१२६) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत शहर विभाग जालना

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | विष्णु अं. हंबिरे | अध्यक्ष |
| | प्रदीप. अ. सगणे | सदस्य/सचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दखल केली आहे. अर्जदाराने दखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०७/०६/२०१० रोजी जालना मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी,जालना यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २२/०६/२०१० रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकाने महावितरण कंपनीकडुन कांडप मशीन वापरासाठी सिंगल फेज वाणिज्य विद्युत पुरवठा घेतला आहे.वरील कांडप मशीन बंद पडल्यामुळे सन २००५ मध्ये विद्युत पुरवठा तात्पुरता खंडीत करण्याबाबत महावितरण कंपनीकडे अर्ज दाखल केला व कंपनीने स्थळ निरिक्षण करुन विद्युत पुरवठा बंद केला.त्यानंतर ग्राहकास कमीत कमी आकारणीची विज देयके देणे आवश्यक आसतांना त्यांना सरासरी आकारणीची विज देयके देण्यात आली.वरील सरासरी आकारणी बाबत ग्राहकाने महावितरण कंपनीकडें वारंवार लेखी तक्रारी दाखल केलेल्या आहेत परंतु त्याची दखल न घेता कंपनीने दिनांक २४/०३/२०१० रोजी लेखी नोटीस पाठवुन रुपये १५,०००/- भरण्याबाबात सुचित केले.सन २००५ ते २०१० या कालावधीत विजेचा वापर नसतांना प्रत्यक्ष मीटर रिडींग न घेता अवास्तव विज देयक देण्यात आल्यामुळे ग्राहकाने या मंचात तक्रार दाखल करुन सुधारीत विज देयक देण्याची मागणी केली.तसेच विज पुरवठा कायमचा बंद करण्याचे आदेश महावितरण कंपनीस देण्याची विनंती करुन झालेल्या मानसिक त्रासापोटी रुपये १०,०००/- नुकसान भरपाई मिळवुन देण्याची विनंती मंचास केली.

२) वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक २२/०६/२०१० रोजी घेण्यात आली सुनावणीस नोडल अधिकारी श्री कमरुद्दीन कार्यकारी अभियंता (प्रशासन) जालना, श्री आर.एन.सोनट सहाय्यक अभियंता परतुर व वीज ग्राहक उपस्थित होते. वीज ग्राहकाने त्याचा वीज वापर सन २००३ पासुन बंद असल्याचे सांगुन त्यांना कमी कमी आकारणी ऐवजी सरासरी आकारणीची वीज देयके देण्यात आल्याचे सांगीतले त्यांनी सुधारीत वीज देयक देण्याची विनंती मंचास केली व त्यांचा विद्युत पुरवठा कायमचा बंद करण्याची विनंती मंचास केली. नोडल अधिकारी यांनी ग्राहकास सरासरी आकारणीचे वीज देयक देण्यात आल्याचे सांगुन माहे डिसेंबर २००६ ते एप्रिल २०१० या कालावधीत देण्यात आलेले विज देयक दुरुस्त करुन ग्राहकास रुपये ८४३८/- चे क्रेडीट देण्याचा प्रस्ताव मंचात सादर केला.दोन्ही बाजुकडुन करण्यात आलेले निवेदन ऐकल्यानंतर मंचाने नोडल अधिकारी यांना ग्राहकाचा विद्युत पुरवठा कायमचा बंद करुन पी.डी. अहवाल तीन दिवासांच्या आत सादर करण्यास सांगुन प्रकरण निकालासाठी ठेवले.

३) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल केलेल्या कागदपत्रा वरुन असे दिसुन येते की,ग्राहकाने कांडप यंत्र चालविण्या करीता वीज पुरवठा घेतला असुन त्यांचा वापर जानेवारी २००४ पासुन बंद असल्याचे सी.पी.एल.वरुन आढळुन येते. वीजेचा वापर होते नसत्यामुळे वीज पुरवठा तात्पुरता बंद करण्याबाबत व कमीत कमी आकारणीचे वीज देयक देण्याबाबत ग्राहकाने सन २००५ पासुन लेखी पत्राद्वारे महावितरण कंपनीस पाठपुरावा केल्याचे दिसुन येत आहे. कनिष्ठ अभियंता परतुर (शहर) यांनी दिनांक २५/१०/२००५ रोजी केलेल्या स्थळ निरिक्षण अहवालावरुन ग्राहकाकडे ००४००७९१ क्रमांकाचे मीटर लावले असुन त्याचे रिडींग ००४४४ असल्याची नोंद केली आहे.तसेच अहवालामध्ये कांडप यंत्र नादुरुस्त झाल्यामुळे ग्राहकाचा वीज वापर बंद असल्याची नोंद केली आहे.ग्राहकाच्या सी.पी.एल.चे निरिक्षण केले असता असे दिसुन येते की, ग्राहकास जानेवारी २००४ ते एप्रिल २०१० या कालावधीत लॉक, आर.एन.ए.स्टेटस दाखवुन सरासरी आकारणीची वीज देयक देण्यात आली.मे २००७ ते डिसेंबर २००८ या कालावधीमध्ये ग्राहकाचे मीटर रिडींग ६६४ पासुन पुढे १६०० युनिट पर्यंत घेण्यात आल्याचे दिसुन येते.नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या पी.डी. अहवालानुसार वरील मीटरचे दिनांक १६/०६/२०१० रोजीचे अंतिम वाचन ०४४४ असल्याची नोंद केली आहे.सी.पी.एल.नुसार ग्राहकाने माहे ऑक्टोबर २००६ पर्यत नियमीतपणे वीज देयकाचा भरणा केला असल्याचे दिसुन येत आहे.

४) वरील कागदपत्रावरुन असे दिसुन येते की, ग्राहकाचा वीज वापर जानेवारी २००४ पासुन बंद असुनही महावितरण कंपनीने ग्राहकास चुकीची मीटर रिडींग घेवुन सरासरी आकारणीची वीज देयक दिलेली आहेत.तरी पण ग्राहकाने माहे ऑक्टोबर २००६ पर्यंत वीज देयकाचा भरणा केलेला आहे. ग्राहकाने वीज पुरवठा कायमचा बंद करण्याबाबत लेखी अर्ज केल्यानंतरही महावितरण कंपनीने त्यांच्या अर्जाची दखल न घेता सरासरी वीज देयक आकारणी सुरु ठेवली व मंचात तक्रार दाखल केल्यानंतर मंचाच्या आदेशानुसार दिनांक १६/०६/२०१० रोजी वीज पुवठा खंडीत केला.ग्राहकाने माहे जानेवारी २००४ पासुन वीजेचा वापर केलेला नसत्यामुळे माहे जुन २०१० अखेर पर्यंत करण्यात आलेली वीज आकारणी व थकबाकीची रक्कम ही चुकीची (फीक्टीशीयस्) स्वरुपाची असल्यामुळे ती रद्द करणे योग्य होईल असे मंचाचे मत आहे.त्यामुळे नोडल अधिकारी यांनी केवळ रुपये ८४३८/- चे क्रेडीट देण्याबाबत सादर केलेला प्रस्ताव योग्य नसल्यामुळे तो मान्य करता येणार नाही.

# आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास माहे जुन २०१० अखेर पर्यंत केलेली चुकीची वीज आकारणी पुर्ण पणे रद्द करण्यात येत आहे.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

| प्र. अ. सगणे | विलासचंद्र सु. काबरा | विष्णु अं. हंबिरे |
|---|---|---|
| सदस्य/सचिव | सदस्य | अध्यक्ष |